# मराठी संवर्धनात अमराठींनी रोवला झेंडा

## भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा सांगता समारोप नुकताच पार पडला. यावेळी कॉलनीचे लेखक सिद्धार्थ पारधे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पारधे यांनी आपल्या जीवनातील अनुभव सांगितले आणि त्यांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास कशामुळे प्रोत्साहन मिळाले त्याबद्दलही चर्चा केली.

कॉलनी, सिद्धार्थ पारधे यांच्या आत्मचरित्राला २००९ साली केशवराव कोठावळे पुरस्कार मिळाला होता.

मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये मराठी आणि अमराठी भाषक कर्मचाऱ्यांच्या उत्साही सहभागाबद्दल मी कौतुक करतो, असे कॉर्पोरेशनचे प्रकल्प संचालक एस.के. गुप्ता म्हणाले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त १४ ते २८ जानेवारीदरम्यान मराठी निबंधलेखन, काव्य स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, प्रश्नमंजूषा, शुद्धलेखन, शब्दकोडे आणि अभिवाचन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

### कथा संघर्षाची

ही कथा वांद्रे येथील साहित्य सहवास कॉलनी बांधत असताना सुरक्षा रक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीचा मुलगा होता. सामाजिक अडथळ्यांच्या पलीकडे जाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या व लढणाऱ्या व्यक्तीची ही कथा आहे.

### पुरस्कार विजेते

- **निबंधलेखन** - १) दयानंद चिंचोलीकर, २) गणेश घुले, ३) नभा शिरोडकर, ४) गौरी कार्तिकेय
- **घोषवाक्य स्पर्धा** - १) रेखा माझिरे, २) नूपुर चित्ते, ३) सागर खोलमकर, ४) ज्योती नायर.
- **शुद्धलेखन** - १) आफरीन शेख, २) नीती तामसे, ३) नभा शिरोडकर, ४) प्रीता नायर.
- **शब्दकोडे** - १) गणेश पाटील, २) सुप्रिया मोरे, ३) अश्विनी साळुंखे, ४) नाजनीन शेख.
- **प्रश्नमंजूषा** - १) योगेंद्र मोरे, २) मयूर कदम, ३) अमित जांभळे, ४) अर्शद नसीम.
- **अभिवाचन स्पर्धा** - १) फराह इराणी, २) नभा शिरोडकर, ३) योगेश गोताड.
- **काव्य स्पर्धा** - १) नभा शिरोडकर, २) फराह इराणी, ३) विवेक भारंबे.